**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ मध्ये असलेली मुदत ३० वर्षासाठी पूर्वलक्षी प्रभावाने वाढवून देण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक : आदिवासी-१००९/प्र.क्र.३२३/ल-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : ३१ मे, २०१२**

## परिपत्रक

**प्रस्तावना :-**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ अन्वये राज्यातील आदिवासी खातेदाराच्या जमिनीचे कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणास निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तसेच कलम ३६-अ अन्वये आदिवासी खातेदाराच्या जमिनीचे हस्तांतरण शासनाच्या पूर्वपरवानगीने करण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमाखाली करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (अनुसूचित जमातीच्या व्यक्तीकडून जमातीयेतरांकडे भोगाधिकार हस्तांतरीत करणे) नियम १९७५ मधील तरतुदीनुसार अशा हस्तांतरणास परवानगी दिली जाते.

२. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ या कायद्यान्वये दिनांक १.४.१९५७ ते ६.७.१९७४ या कालावधीमध्ये ज्या आदिवासी खातेदाराच्या जमिनीचे बिगर आदिवासी व्यक्तीकडे कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण झाले असल्यास सदर जमीन संबंधित मूळ आदिवासी खातेदार किंवा त्यांचे वारसास प्रत्यार्पित करण्यासाठी अर्ज करण्याची ३० वर्षाची मुदत होती. सदर मुदतवाढ सन १९९१ मध्ये सुधारणा करुन जुलै, १९७४ पासून ३० वर्षाकरिता वाढविण्यात आली होती. ती मुदत दिनांक ६/७/२००४ रोजी संपलेली आहे. आदिवासी जमीन धारकाच्या जमिनीचे बिगर आदिवासी व्यक्तीकडे हस्तांतरण झालेल्या जमिनी मूळ आदिवासी धारकाकडे प्रत्यार्पित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वाधिकारे चौकशी करण्याकरीता कोणतीही कालमर्यादा विहित नाही. अशी चौकशी जिल्हाधिकारी केव्हाही करु शकतात. मात्र जिल्हाधिकारी सदर अधिकार न वापरता त्याउलट मुदत संपली असे सांगून प्रकरणे निकाली काढतात, असे निदर्शनास आलेले आहे. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४५ व्या बैठकीच्या वेळी सदरच्या अधिनियमात घालून दिलेली ३० वर्षांची मुदत २००४ मध्ये संपुष्टात आल्यामुळे ती पूर्वलक्षीप्रभावाने आणखी ३० वर्षे वाढवून देण्याबाबत करण्यात आलेल्या सूचनेच्या अनुषंगाने, सदरहू मुदतवाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, त्याअनुषंगाने शासनाने उपरोक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला.

३. विधानमंडळाच्या सन २०१० च्या पावसाळी अधिवेशनात उक्त संहितेतील मुदतवाढीबाबतच्या सुधारणांना विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या मान्यतेनंतर, "सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३" या अधिनियमास मा.राज्यपाल व मा.राष्ट्रपती यांनी दिलेल्या मान्यतेनंतर सदरहू अधिनियम दिनांक ३० डिसेंबर, २०११ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात "सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४३"


C: Documents and Settings\... My Documents\... Policy Matter Cabinet 1974 ACt Ext Cab...

[महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचीत जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी (सुधारणा) अधिनियम, २०१० ] म्हणून प्रसिध्द झालेला आहे. (प्रती सोबत जोडल्या आहेत.) त्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ च्या कलम ३ व ४ मधील वर नमूद निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या दुरुस्त्या खालीलप्रमाणे आहेत.

**(१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याची सुधारणा** :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३६ मधील, पोट-कलम (३) मध्ये-

(क) "कब्जांच्या अशा हस्तांतरणापासून तीस वर्षाच्या आत" या मजकुराऐवजी,"६ जुलै, २००४ पासून तीस वर्षाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) पहिल्या परंतुकामध्ये "अशा प्रारंभापासून तीस वर्षाच्या आत" या मजकुराऐवजी, "६ जुलै, २००४ पासून तीस वर्षाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३६ मध्ये, पोट-कलम (४) मधील-

"वहिवाटीचे हस्तांतरण झाल्याच्या दिनांकापासून तीस वर्षाच्या आत" या मजकुराऐवजी,"६ जुलै २००४ पासून तीस वर्षाच्या आत," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(२) महाराष्ट्र अनुसूचीत जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ याची सुधारणा :-**

महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ याच्या कलम ३ मध्ये, पोटकलम (१) मधील, " या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस वर्षाच्या आत" या मजकूराऐवजी, "६ जुलै, २००४ पासून तीस वर्षाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, " या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस वर्षाच्या आत" या मजकुराऐवजी, "६ जुलै, २००४ पासून तीस वर्षाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. उपरोक्त सुधारणा दिनांक ६ जुलै, २००४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात आलेल्या असल्याने या प्रकरणी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) जिल्हाधिकारी यांनी अशा प्रकरणांबाबत तात्काळ आढावा घेऊन अशी प्रकरणे निदर्शनास आल्याबरोबर व प्रलंबित असलेल्या प्रकरणात लगेच आदिवासी खातेदारांना कायद्यातील तरतुदीनुसार जमिनी प्रत्यार्पित करण्याची आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी. अशी कार्यवाही करताना विशिष्ट कार्यक्रमाची आखणी करुन, त्यातील १०० टक्के प्रकरणे विशिष्ट मुदतीत निकाली काढण्यात यावीत.

२) सदरहू प्रकरणे निकाली काढताना आदिवासी खातेदारांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही याबाबत पुर्णपणे दक्षता घेण्यात यावी.

३) जिल्ह्यातील सर्व आदिवासी खातेदारास या कायद्याबाबत माहिती होईल अशात-हेने जिल्हा स्तरावर /तालुका स्तरावर/ ग्रामपंचायत स्तरावर/तलाठी सजा तसेच जिल्ह्यातील आदिवासी स्वयंसेवी संघटना, आदिवासी सहकारी संस्था येथे या सुधारणेबाबत आवश्यक ती प्रसिध्दी देऊन, आदिवासी खातेदारांना या तरतूदींची माहिती देण्यात यावी व त्याअनुषंगाने मार्गदर्शन करण्यात यावे, त्यावर तहसिलदार/ उपविभागीय अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे.

४) उपरोक्त सर्व कार्यक्रमावर विभागीय आयुक्त यांनी नियंत्रण ठेऊन, त्याबाबत प्रत्येक महिन्याला आवश्यक त्या प्रकरणाचा निपटारा होतो किंवा कसे याबाबत खात्री करावी व त्याबाबत त्यांच्या

विभागाचा मासिक अहवाल [**१) नोंदीत प्रकरणे २) आदेशीत प्रकरणे ३) नाकारलेली प्रकरणे ४)प्रत्यार्पित केलेल्या जमिनी ५) ज्या आदिवासींना जमिनी प्रत्यार्पित केलेल्या आहेत त्या आदिवासींची संख्या ६) प्रलंबीत प्रकरणे ७) प्रत्यार्पित करावयाच्या जमिनीचे क्षेत्र या नमुन्यात|** प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्राप्त होईल अशा रितीने शासनाकडे पाठविण्यात यावा.

५) आदिवासी खातेदारांच्या जमिनींचे अवैध हस्तांतरण अथवा आदिवासींची कोणत्याही प्रकारे फसवणूक होणार नाही आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींचे भोगाधिकार जनजातीयेतरांकडे हस्तांतरीत करणे) नियम, १९७५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६अ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल, याची जिल्हाधिकारी यांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

६) ज्या ठिकाणी आदिवासींच्या जमिनीवर कायद्यातील तरतुदींचा भंग करुन अतिक्रमण / हस्तांतरण झाले असेल याबाबत जिल्हाधिकारी यांनी विशिष्ट मुदतीत शोध मोहिम राबवून अशा जमिनी प्रत्यक्षात व कागदोपत्री आदिवासींच्या ताब्यात देण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

७) आदिवासी जमिनीच्या अनुषंगाने, शासन निर्णय क्र.लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दिनांक १७ मार्च,२०१२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा.

८) या शासन परिपत्रकाच्या निर्गमित केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत विशिष्ट मोहिम राबवून आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या ७/१२ वर इतर हक्क सदरी "म.ज.म.अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६अ ला पात्र" अशी नोंद तात्काळ घेण्यात यावी.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक **2012052912570959001** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

३१/५/१२

**(एस.एस.पाटील)**
**शासनाचे उप सचिव**
**महसूल व वन विभाग**

**प्रती,**

१) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ०५ प्रती),
२) सर्व जिल्हाधिकारी (प्रत्येकी १५ प्रतीत)
३) कार्यासन अधिकारी तथा वेब को-ऑर्डीनेटर.(ल-१ सेल) महसूल व वन विभाग.(२प्रती)
४) निवड नस्ती, ल-९ कार्यासन, व कार्यासन ल-५, ल-६, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ३२ (योग्य त्या कार्यवाहीसाठी)

**प्रत, माहितीस्तव सविनय सादर,**
मा.मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.



C:\Documents and Settings\... My Documents\... Policy Matter Cabinet 1974 ...

RNI No. MAHENG/2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष ३, अंक ५०] शुक्रवार, डिसेंबर ३०, २०११/पौष ९, शके १९३३ [पृष्ठे २, किंमत : रुपये १४

असाधारण क्रमांक १२९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code and the Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes (Amendment ) Act, 2010 (Maharashtra Act No. XLIII of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 2011.

(First pubished, after having received the assent of the President, in the "*Maharashtra Government Gazette*" on the 30th December 2011.)

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 and the Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes Act, 1974.

Mah. XLI of 1966. Mah. XIV of 1975.

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 and the Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes Act, 1974, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Land Revenue Code and the Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes (Amendment) Act, 2010.

(2) It shall be deemed to have come into force with effect from the 6th July 2004.

## CHAPTER II

## AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966

Amendment of section 36 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 36 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"), in sub-section (*3*),— Mah. XLI of 1966.

(*a*) for the words "within thirty years of such transfer of possession" the words, figures and letters "within thirty years from the 6th July 2004" shall be substituted ;

(*b*) in the first proviso, for the words "within thirty years of such commencement" the words, figures and letters "within thirty years from the 6th July 2004" shall be substituted.

Amendment of section 36A of Mah. XLI of 1966.

**3.** In section 36A of the said Code, in sub-section (*4*), for the words "within thirty years from the date of the transfer of occupancy" the words, figures and letters "within thirty years from the 6th July 2004" shall be substituted.

## CHAPTER III

## AMENDMENTS TO THE MAHARASHTRA RESTORATION OF LANDS TO SCHEDULED TRIBES ACT, 1974

Amendment of section 3 of Mah. XIV of 1975.

**4.** In section 3 of the Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes Act, 1974 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*1*), for the words "within thirty years from the commencement of this Act" the words, figures and letters "within thirty years from the 6th July 2004" shall be substituted. Mah. XIV of 1975.

Amendment of section 4 of Mah. XIV of 1975.

**5.** In section 4 of the principal Act, for the words "within thirty years from the commencement of this Act" the words, figures and letters "within thirty years from the 6th July 2004" shall be substituted.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३१] शुक्रवार, डिसेंबर ३०, २०११/पौष ९, शके १९३३ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक ७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . **पृष्ठे** १-२

दिनांक १७ डिसेंबर २०११ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ३० डिसेंबर २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१. १९७५ चा महा. १४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ६ जुलै २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याची सुधारणा.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३६ ची सुधारणा. २. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त संहिता" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३६ मधील, पोट-कलम (३) मध्ये,— १९६६ चा महा. ४१.

(क) " कब्जांच्या अशा हस्तांतरणापासून तीस वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी, " ६ जुलै २००४ पासून तीस वर्षांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये " अशा प्रारंभापासून तीस वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी, " ६ जुलै २००४ पासून तीस वर्षांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३६क ची सुधारणा. ३. उक्त संहितेच्या कलम ३६क मध्ये, पोट-कलम (४) मधील, " वहिवाटीचे हस्तांतरण झाल्याच्या दिनांकापासून तीस वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी, " ६ जुलै २००४ पासून तीस वर्षांच्या आत," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ याची सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३ ची सुधारणा. ४. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी, " ६ जुलै २००४ पासून तीस वर्षांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७५ चा महा. १४.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४ ची सुधारणा. ५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, " या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस वर्षांच्या आत " या मजकुराऐवजी, " ६ जुलै २००४ पासून तीस वर्षांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI